MHBU150004162022

दाखल दिनांक - ०७.०६.२०२२
नोंदणी दिनांक - ०७.०६.२०२२
निकाल दिनांक - ०४.०५.२०२६
कालावधी - ३ वर्ष १० महिने २७ दिवस

**भाग – अ**

**नमुना क्र.३२**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(i) अन्वये)

## प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) देऊळगांव राजा यांचे न्यायालयात.

**(पिठासीन अधिकारी : श्री. हसीम एम. बेग)**

**नियमित फौजदारी खटला क्र. १५८/२०२२** **अपराध क्र. ५७/२०२२**
संगणकीकृत नोंदणी क्र.**एमएचबीयु१५०००४१६२०२२** **निशाणी - ३०**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | : | | **महाराष्ट्र शासन** व्दारा<br>अंढेरा पोलीस स्टेशन,<br>ता. देऊळगांव राजा, जि. बुलढाणा. |
| **विधीज्ञ** | | | ॲड. श्रीमती ए.पी. सावजी |
| **आरोपी** | : | | **सुशिल गोकुळ अवचार,**<br>वय : ३५ वर्षे, धंदा : चालक,<br>रा. कातखेड, पो.विझोरा, ता. बार्शिटाकळी,<br>जि.अकोला. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | : | | ॲड. श्री. पी.बी. घेवंदे |

**भाग – 'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १४.०२.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | १४.०२.२०२२ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०७.०६.२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | ३१.०१.२०२३ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | १७.०६.२०२३ |
| प्रकरण न्यायनिर्णय करीता ठेवले ती तारीख | ०४.०५.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | -- |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी.सी. प्रमाणे शिक्षेमधुन सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुशिल गोकुळ अवचार, | १५.०२.२०२२ | १५.०२.२०२२ | कलम ३०४-अ, २७९,३३७ व ३३८ भादंवि | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. | - | - |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०४.०५.२०२६ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द प्रस्तुत खटला कलम ३०४-अ, २७९, ३३७ व ३३८ भारतीय दंड संहिता, १८६० (यापुढे भादंवि म्हणुन संबोधण्यात येईल) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणेः-**

**२.** फिर्यादी संतोष रमेश जाधव, याने पोलिस स्टेशन अंढेरा येथे रिपोर्ट दिला की, दिनांक १४.०२.२०२२ रोजी त्याचा चुलत मामा उत्तम साहेबराव गायकवाड व राजेश जगन्नाथ केसकर हे त्यांच्या मोटार सायकल क्रमांक एम.एच.२८ ए.पी. ७१९२ व सोबत दुसरी मोटार सायकलवर ते असे सोबत वास्तु शांतीच्या कार्यक्रमासाठी जात असतांना सकाळी अंदाजे ९.५० वाजेच्या दरम्यान अंढेरा फाट्याजवळील विजय हॉटेलकडे जाणेसाठी डिव्हायडरच्या मधोमध असलेल्या जागेत मोटार सायकल उभ्या केल्या होत्या. त्यावेळस, देऊळगाव राजाहुन येणाऱ्या एस.टी.बस क्रमांक एम.एच.२० बी.एल ३७८२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मोटार सायकल क्रमांक एम.एच.२८ ए.पी. ७१९२ ला समोरच्या बाजूस जबर धडक दिली. त्यामुळे, फिर्यादीचे मामा उत्तम साहेबराव गायकवाड मरण पावले. करीता, फिर्यादीने आरोपी विरुध्द सदरची फिर्याद दाखल केली आहे.

३. सदर तक्रारीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, अंढेरा येथे गुन्हा क्रमांक ५७/२०२२ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास गजानन पाटीलबा वाघ यांनी केला होता. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा, इनक्वेस्ट पंचनामा केला. आरोपीला अटक केले, वाहनची तांत्रीक तपासणी केली, वैद्यकीय अहवाल मिळवला. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीविरुद्ध पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुद्ध निशाणी क्रमांक १० वर कलम ३०४-अ, २७९, ३३७ व ३३८ भादंवि अन्वये दोषारोप ठेवला. सदर दोषारोप आरोपीला समजावुन सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपीविरुध्द दोषपुर्ण कथन पटलावर आले असल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र. २९ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपीचा बचाव आहे की, त्याच्याविरुध्द खोटी केस केली आहे.

६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.पी. सावजी व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी.बी. घेवंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, आरोपीने त्याचे ताब्यातील एस.टी बस क्रमांक एम.एच.२० बी.एल ३७८२ मानवी जीवन धोक्यात येईल अशा रितीने निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालविले? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालवून फिर्यादीच्या मामा उत्तम साहेबराव गायकवाड यांचे मोटर सायकला समोरुन धडक देवून मरणास कारणीभूत ठरला.? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालवून फिर्यादीच्या मामा उत्तम साहेबराव गायकवाड यांना दुखापत केली? | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालवून फिर्यादीच्या मामा उत्तम साहेबराव गायकवाड यांना जबर दुखापत केली? | **नाही.** |
| ५. | आदेश काय? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. ०१ ते ०४ करीता -**

८. सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने विनासंशय खालील बाबी सिद्ध करणे आवश्यक आहे.

a) आरोपीने त्याचे ताब्यातील एस.टी बस क्र. एम.एच.२० बी.एल ३७८२ मानवी जीवन धोक्यात येईल अशा रितीने निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालविले.

b) आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालवून फिर्यादीचे मामा उत्तम साहेबराव गायकवाड याचे मोटार सायकला समोरुन धडक देऊन त्यांचे मरण्यास कारणीभूत ठरला.

c) आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मामा उत्तम साहेबराव गायकवाड याला जबर दुखापत करून जखमी केले.

d) आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मामा उत्तम साहेबराव गायकवाड याला दुखापत करून जखमी केले.

**९.** सदर बाबी व गुन्हा आरोपीविरूध्द सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने वर नमुद एकूण ६ साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे व इतर कोणतेही साक्षीदार तपासलेले नाही.

**१०.** अभियोग सा.क्र.१ संतोष रमेश जाध यास नि.क्र. १२ अन्वये तपासण्यात आले. त्याने त्याचे पुराव्यादरम्यान असे सांगितले की, घटना दिनांक १४.०२.२०२२ रोजी सकाळी ०९.४५ वाजेदरम्यान अंढेरा फाटा विजय हॉटेल समोर घडली होती. त्यादिवशी त्यांचे सोबत दोन मोटर सायकल होत्या. एका मोटर सायकलवर ते व त्यांचे मामा गजानन गुणाजी दाते आणि दुसऱ्या मोटर सायकलवर उत्तम साहेबराव गायकवाड व त्यांच्या मागे राजेश जगन्नाथ केसकर हे होते. अंढेरा फाटा येथे ते नास्टा करण्यासाठी डिव्हायडरच्या मधोमध आले. समोरुन निष्काळजीपणे बस आल्यानंतर त्या बसने उत्तम साहेबराव गायकवाड यांच्या गाडीला धडक दिली. त्यामुळे, त्याचे मामा उत्तम यांची गाडी डिव्हायडरला जाऊन आदळली. त्यामुळे, उत्तम यांच्या गाडीच्या मागे असलेला व्यक्ती खाली पडलेला होता व त्याचे मामा लांब पडले होते व त्यांच्या डोक्याला व पायाला मार लागला. त्यावेळेस, त्याचे मागे बसलेले गजानन गुणाजी दाते त्यांना बघण्यासाठी गेले. त्यानंतर, ते उतरला व राजेश जगन्नाथ केसकर यांना बघण्यासाठी गेला, त्यांचा हात मोडलेला होता व त्यांच्या डोक्याला लागलेले होते. घटनास्थळी जमलेल्या लोकांनी राजेशला खाजगी गाडीने चिखली येथे नेले. उत्तम साहेबराव गायकवाड यांचा जागेवर मृत्यु झाला होता.

**११.** पुढे त्यांच्या साक्षीत असे आले की, जमलेल्या लोकांनी त्याचे नातेवाईकांना फोन लावला व त्यांना घटनेबद्दल सांगितले. त्याला तेथील जमलेल्या लोकांनी चिखली येथील सरकारी दवाखान्यात नेले. पोलीसवाले चिखली येथील सरकारी दवाखान्यात आले. उत्तम यांचा प्रेत पोस्ट मॉर्टम झाल्यानंतर त्यांच्या ताब्यात देण्यात

आले. त्यानंतर ते अंदाजे संध्याकाळी ०५.३० ते ०६.०० च्या दरम्यान पोलीस स्टेशन अंढेरा येथे आले व एस.टी. बस विरुद्ध फिर्याद दिली. त्याने अभिलेखावरुन दिलेला तोंडी रिपोर्ट, प्रथम खबर अहवाल ओळखला. तो तोच असुन त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.१३ व १४** देण्यात आले. ते आरोपीला ओळखतात.

**१२.** बचाव पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. त्या दरम्यान साक्षीदाराने कबुल केले की, देऊळगाव राजा ते चिखली रस्ता उत्तर–दक्षिण व चौपदरी रस्ता आहे व त्याच्या मधोमध डिव्हायडर आहे. घटनेच्या दिवशी त्याचे मामा उत्तम गायकवाड ची गाडी त्याचे गाडीच्या १५ ते २० फुट मागे होती. त्यांना विजय वाईन बार येथे जायचे होते. तसेच त्याने कबुल केले की, रस्ता ओलांडतांना रस्त्याच्या बाजुने एखादे वाहन येत आहे किंवा नाही याची शहानिशा करावी लागते.

**१३.** त्याचे उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, घटनेच्या दिवशी त्याचे मामाने त्यांची गाडी न थांबवता टर्न मारला व तेवढयात बस आली त्यामुळे अपघात झाला. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, फिर्यादीची गाडी त्यांचे मामाच्या गाडीच्या २० फुट मागे होती. परंतु, त्याच्या गाडीचे कोणतेही नुकसान झाले नाही. त्याच्या उलटतपासामध्ये हे देखील आलेले आहे की, घटनास्थळावर विजय वाईन बारला सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहे व त्यामध्ये अपघाताचे चित्रीकरण झालेले आहे.

**१४.** आरोपीने बचाव घेतला की, फिर्यादीच्या मामाला नुकसान भरपाई मिळावे म्हणुन सदरचे प्रकरण दाखल केले आहे. फिर्यादीला त्याच्या उलटतपासा दरम्यान आरोपीतर्फे विचारण्यात आले होते की, सदरचे प्रकरण फिर्यादीने त्याचे मामाला नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल केले आहे. सदर उत्तरास फिर्यादीने होकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे, बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या बचावामध्ये तथ्ये दिसुन येते.

**१५.** अभियोग सा.क्र. २ गजानन गुणाजी दाते, यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, घटना दिनांक १४.०२.२०२२ रोजी सकाळी ०९.५० वाजेदरम्यान अंढेरा फाटा विजय बाईन बार समोर घडली होती. त्यादिवशी ते दोन मोटर सायकलने जात होते.

एका मोटर सायकलवर ते व संतोष रमेश जाधव आणि दुसऱ्या मोटर सायकलवर उत्तम साहेबराव गायकवाड व त्यांच्या मागे राजेश जगन्नाथ केसकर हे होते. अंढेरा फाटा येथे विजय बाईन बार समोर चहा–नास्ता करण्यासाठी ते डिव्हायडरच्या मधोमध थांबले. जालना वरुन चिखली मार्गाने जाणारी बस आली व त्या बसने उत्तम साहेबराव गायकवाड यांच्या मोटर सायकलला धडक दिली. धडक दिल्यानंतर राजेश जगन्नाथ केसकर हे मागे पडले व उत्तम साहेबराव गायकवाड हे गाडीसह डिव्हायडरला धडकले. ते व संतोष रमेश जाधव यांनी त्यांना जाऊन बघितले असता उत्तम साहेबराव गायकवाड यांच्या हात, पाय व डोक्याला जबर मार लागला होता. त्यांचा मृत्यू जागेवर झाला होता. त्याने एका गाडीचा सहारा घेऊन त्यांना चिखली हॉस्पीटलला नेले. तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर त्याने त्यांचा अंतिम संस्कार केला.

**१६.** आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचे विस्तृत उलटतपास घेण्यात आला. त्याने त्याच्या उलटतपासामध्ये कबुल केले की, चिखली ते देऊळगाव राजा हा चौपदरी रस्ता आहे व ते सदर रस्त्याचे डिव्हायडरच्या मधोमध्ये येवुन थांबले होते व उत्तम गायकवाड हे त्यांची गाडी घेऊन एक फुट पुढे उभे होते. त्याने असे कबुल केले की, जर उत्तमची मोटार सायकल ही डिव्हायडरच्या पुढे गेली नसती तर त्याचा अपघात झाला नसता. तसेच त्याच्या उलट तपासादरम्यान हे स्पष्ट होते की, घटनेच्या दिवशी इतर १५ ते २० लोक जमा झाले होते व त्या लोकांनी सुध्दा घटना पाहीलेली आहे.

**१७.** अभियोग सा.क्र. ३ राजेश जगन्नाथ केसकर याची साक्ष नि.क्र. १६ वर नोंदविण्यात आली आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितली आहे की, घटना ही दिनांक १४.०२.२०२२ रोजी सकाळी ९.३० ते १०.०० दरम्यान अंढेरा फाटा विजय वाईन बार येथे घडले होते. त्या दिवशी एक पांढरी गाडी समोरुन आली व त्यानंतर ते डिव्हायडर जवळ गेले असता, समोरुन एस.टी.बस वेगात आली. त्यानंतर काय झाले त्याला काही कळाले नाही.

**१८.** त्याने उलटतपासादरम्यान कबुल केले की, उत्तम गायकवाड याने अचानकपणे हॉटेलवर जाणेसाठी टर्न मारल्यामुळे अपघात घडला. त्याने पुढे असे कबुल

केले की, मयत उत्तमने समोरुन येणाऱ्या वाहनाची शहानिशा केली असती तर अपघात घडला नसता.

**१९.** अभियोग सा.क्र. ४ ज्योती उत्तम गायकवाड हे घटनेतील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही व तिला अपघाता बद्दल फोनवर माहिती मिळाली होती. त्यामुळे, तिच्या साक्षीस कोणतेही महत्व प्राप्त होत नाही.

**२०.** साक्षीदार क्रमांक ५ अभिषेक प्रकाश अहिरे यांचे साक्षीत असे आले आहे की, त्यांनी वाहणांची तांत्रीक तपासणी करुन रिपोर्ट दाखल केला. त्याने अभिलेखावर रिपोर्ट ओळखला. तो निशाणी क्रमांक २१ वर आहे. त्याने उलट तपासादरम्यान कबुल केले की, त्यांच्या कार्यालयातुन कोणतेही पत्र किंवा कागद त्यांना प्राप्त झाला किंवा कार्यालयातुन बाहेर जाताना त्यावर आवक व जावक क्रमांक नोंदवतात. परंतु, निशाणी क्रमांक २१ वरील अहवालामध्ये आवक जावक क्रमांक नमुद नाही. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासामध्ये कोणत्या वाहणाची तांत्रीक तपासणी केली हे देखील नमुद केली नाही. तसेच वाहणाचे कोणते नुकसान झाले हे सांगितलेले नाही.

**२१.** अभियोग सा.क्र. ६ गजानन पाटीलबा वाघ हे सदर प्रकरणात तपासी अंमलदार आहे. त्यांची साक्ष नि.क्र. ४ वर नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे नमुद केले की, घटना ही दिनांक १४.०२.२०२२ रोजी घडली होती. घटेनचा तपास त्यांनी केला तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा, इनक्वेस्ट पंचनामा केला, वाहणाची तांत्रीक तपासणी केली. तपासांती पुरावा मिळुन आल्याने आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**२२.** अभियोग पक्षाने एकुण ६ साक्षीदार तपासलेले आहे. साक्षीदार क्र. १ हा घटनेतील फिर्यादी आहे. घटनेच्या दिवशी त्याचे मामा उत्तम गायकवाड एका मोटरसायकलवर व तो एका मोटरसायकलवर तसेच त्यांच्यासोबत साक्षीदार क्र. २ व ३ हे सुध्दा होते. सदर साक्षीदाराचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, ते अंढेरा फाटा येथे नाश्ता करण्यासाठी डिव्हायडरच्या मधोमध आले. त्यानंतर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एक बस निष्काळजीपणाने आली व त्या बसने उत्तम गायकवाड यांच्या

गाडीला धडक दिली.

२३. अभिलेखावर दाखल फिर्याद नि.क्र. १३ व प्रथम खबर अहवाल नि.क्र. १४ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये एस. टी. बस क्र. एम.एच. २० बी.एल. ३७८२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील बस भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित आणुन उत्तम साहेबराव गायकवाड याच्या गाडीला धडक दिल्याचे नमुद आहे. परंतु, साक्षीदार क्र. १ ते ३ यांच्या सरतपासातील अवलोकन केले असता, त्यामध्ये उत्तम साहेबराव गायकवाड यांच्या गाडीला कोणत्या एस.टी बसने धडक दिली हे साक्षीदाराने सांगितलेले नाही. तसेच, तपासी अधिकारी यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये सुध्दा उत्तम गायकवाड यांच्या मोटरसायकलला कोणत्या बसने धडक दिली व त्यामुळे ते मरण पावले हे नमुद नाही. तसेच, साक्षीदार क्र. ५ हे मोटर वाहन निरीक्षक आहेत ज्याने सदर घटनेमधील वाहनाची तांत्रिक तपासणी केली आहे. परंतु, त्यांच्या पुराव्यादरम्यान सुध्दा कोणत्या वाहनाची तांत्रिक तपासणी केली हे नमुद नाही. तसेच, तांत्रिक तपासणी अहवाल नि.क्र. २१ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये जावक क्रमांक नमुद नाही.

२४. अभिलेखावरील पुराव्याचे तसेच तपासी अधिकारी यांनी केलेला तपास बघता सदर घटनेतील एस.टी बस क्र. एम.एच. २० बी.एल. ३७८२ ही बस अपघात झाला त्यादिवशी आरोपीच चालवित होता याबद्दल तपासी अधिकारी यांनी तपास करणे आवश्यक होते. परंतु, साक्षीदार क्र. ६ तपासी अधिकारी याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, त्याने घटनेच्या दिवशी आरोपीच सदरची एस.टी बस चालवित होता किंवा कसे याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाच्या खटल्यामध्ये संशय निर्माण होतो.

२५. साक्षीदार क्र. १ ते ६ च्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, उत्तम गायकवाड यांनी त्यांची मोटरसायकल डिव्हायडरच्या मधोमध उभी केली होती व समोरुन येणारे वाहनाची शाहानिशा ना करता त्याने हॉटेल विजय येथे जाण्यासाठी निष्काळजीपणाने त्यांच्या मोटरसायकलचा टर्न घेतला.

२६. अभियोग पक्षाने सदर खटल्यामधील घटनास्थळ व इनक्वेस्ट पंच ज्यांचे नावे

दोषरोप पत्रामध्ये नमुद असुन देखील सुध्दा त्यांची साक्ष अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेली नाही व अभियोग पक्षाने नि.क्र.२८ वर अभियोग पक्षातर्फे पुरावा देणे नसल्याबाबत कळविल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, अभियोग पक्षाने घटनेतील घटनास्थळ व इनक्वेस्ट पंच यांची साक्ष घेणे आवश्यक होते. सदरच्या पंचाची साक्ष घेतली नसल्यामुळे घटनास्थळ व इनक्वेस्ट पंचनामा संशयापलीकडे जाऊन सिध्द झाले नाही. तसेच त्यादिवशी आरोपी हा अपघातग्रस्त एस.टी. बस चालवित होता किंवा कसे ही बाब सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने एस.टी. महामंडळ येथील साक्षीदार तपासणे आवश्यक होते. अभिलेखावर अशी कोणतीही बाब आली नाही जे दर्शविते की, घटनेच्या दिवशी आरोपी हा अपघातग्रस्त एस.टी. बस चालवित होता. अभियोग पक्षातर्फे वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष नोंदविणे आवश्यक होते. परंतु, अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष नोंदविली नाही. तसेच, प्रस्तुत घटनास्थळ बस स्टॅन्ड चौक हे वर्दळीचे ठिकाण असुन अभियोग पक्षाने घटनास्थळावरील इतर स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाच्या खटल्यामध्ये संशय निर्माण झाला आहे.

२७. एकंदरीत तोंडी व लेखी पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, जप्त वाहन घटनेच्या दिवशी आरोपी भरधाव किंवा निष्काळजीपणाने चालवत होता व त्याने फिर्यादीचे मामा उत्तम गायकवाड याच्या मोटरसायकलला एस.टी. बसने धडक देऊन त्याच्या मरणास कारणीभुत ठरला याबद्दल कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे, अभियोग पक्ष आरोपीविरूध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ४ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ०५ करीताः</u>–**

२८. मुद्दा क्रमांक ०१ ते ४ च्या निष्कर्षावरुन अभियोग पक्ष आरोपीवरील दोषारोप सिद्ध करु शकला नसल्याने आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **सुशिल गोकुळ अवचार**, यास कलम ३०४-अ, २७९, ३३७ व ३३८ भारतीय दंड संहिता १८६० च्या कलमांखालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रु. १५,०००/- चे जामिनबंद पत्र द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपीच्या व त्याच्या वकीलाच्या उपस्थितीमध्ये दिनांक ०४.०५.२०२६ रोजी घोषित करण्यात आला.)

स्वा/-

दिनांकः- ०४.०५.२०२६.

**(श्री. हसीम मोहम्मद बेग)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,कोर्ट नं.२
देऊळगांव राजा.

**भाग – 'क'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्ष -**

| **स्थान** | **नाव** | **निशाणी** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | संतोष रमेश जाधव | १२ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | गजानन गुणाजी दाते | १५ | साक्षीदार |
| सा.क्र.३ | राजेश जगन्नाथ केसकर | १६ | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.४ | ज्योती उत्तम गायकवाड | १७ | साक्षीदार |
| सा.क्र.५ | अभिषेक प्रकाश अहिरे | २० | साक्षीदार |
| सा.क्र.६ | गजानन पाटीलबा वाघ | २४ | तपासी अधिकारी |

**ब) बचाव पक्ष, असल्यास -**

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास -**

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची / निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी**

**अ) अभियोग पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | १३ | फिर्याद |
| २ | १४ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | २१ | तांत्रिक तपासणी अहवाल |
| ४ | २५ | घटनास्थळ पंचानामा |
| ५ | २६ | इनक्वेस्ट पंचनामा |

**ब) बचाव पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

**क) बचाव पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

**ड) भौतिक वस्तु -**

| **अ.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशील** |
| --- | --- | --- |
| - | - | - |

स्वा/-

दिनांकः- ०४.०५.२०२६.

**(श्री. हसीम मोहम्मद बेग)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,कोर्ट नं.२
देऊळगांव राजा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील पी.डी.एफ फाईल मधील आदेश मुळ आदेशाप्रमाणे तंतोतंत बरोबर आहे.

०१. कनिष्ठ लिपीकाचे नावः– एस.एम. नाथजोगी (कनिष्ठ लिपीक)

०२. न्यायालयाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देऊळगांव राजा.

०२. अपलोड दिनांकः– ०४/०५/२०२६